# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** येरवडा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0318  **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/08/2026 16:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 13/04/2026
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/05/2026
**Time From (वेळेपासून):** 16:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/08/2026  **Time (वेळ):** 15:44 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/08/2026 15:44 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ट्रिपी टक्लिा, कल्यानीनगर पुणे, व एक्साईज कार्यालय, एच झोन,येरवडा शास्त्रीनगर, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सतिश संभाजी वाळके पोलीस उप-अधिक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8087002020

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जितेंद्र हरिश्चंद्र पाटील | | | 1. फलट नं 804, सारभी, शिवाली,बिल्डींग, मत्यं◌ुजय महादेव ,मंदिरासमोर, कर्वे रोड, कोथरुड,,येरवडा,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद तारीख - 10/08/2026

मी सतिश संभाजी वाळके, वय-53, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उप-अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 8087002020.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिनांक 21/06/2025 रोजीपासून पोलीस उप-अधिक्षक या पदावर कार्यरत आहे. दिनांक 08/05/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असताना मा. पोलीस अधीक्षक, लाप्रवि, पुणे यांनी आम्हास समक्ष सांगीतले की, पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे यांची पदोन्नतीने बदली झाल्याने त्यांचेकडे प्रलंबीत असलेल्या सापळा कारवाईची कागदपत्र ताब्यात घेऊन पुढील पडताळणी व सापळा कारवाई करावी. त्याअनुशंगाने आम्ही पोनि प्रसाद लोणारे यांचेकडील प्रलंबीत सापळा कारवाईचे कागदपत्रे ताब्यात घेऊन सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यामध्ये तक्रारदार श्री ऋषिकांत भगवान अवसरमल वय-37 वर्षे, व्यवसाय लायसन्स कन्सल्टंट रा. बी /2023 प्लॉट नं. 3 विमानदर्शन, संजय पार्क पुणे - 32 पुणे यांचे तक्रारीच्या अनुषंगाने कागदपत्र दिसून आली.

दिनांक 09/04/2026 रोजी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, (प्रशासन), ला.प्र.वि. पुणे यांनी पोनि प्रसाद लोणारे यांना फोन करुन दिनांक 10/04/2026 रोजी तक्रारदार श्री. ऋषिकांत भगवान अवसरमल वय-37 वर्षे, व्यवसाय लायसन्स कन्सल्टंट रा. बी /2023 प्लॉट नं. 3 विमानदर्शन, संजय पार्क पुणे - 32 पुणे हे कार्यालयात येणार असुन त्यांची तक्रार नोंद करुन पुढील कारवाई करणेबाबत आदेशीत केले. तसेच नमुद कारवाईकरीता पंच व स्टाफ सांगीतले. त्याप्रमाणे दिनांक 10/04/2026 रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालीकेचे श्री.आकाश प्रदीप गोसावी वय - 35 वर्षे व्यवयाय नोकरी पद – लिपीक आरोग्य मुख्य कार्यालय पिंपरी चिंचवड महानगर पालिका पुणे व श्री.शुभम प्रभाकर ननवरे वय-28 वर्षे व्यवसाय नोकरी पद लिपीक पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुणे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर झाले. दुपारी 14.15 वा. चे सुमारास पोनि लोणारे यांचे कक्षात एक इसम आले. त्यावेळी पोनि लोणारे यांनी नमुद इसमास त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. ऋषिकांत भगवान अवसरमल वय-37 वर्षे, व्यवसाय लायसन्स कन्सल्टंट रा. बी /2023 प्लॉट नं. 3 विमानदर्शन, संजय पार्क पुणे – 32 असे सांगुन त्यांची लाचेविषयी तक्रार असल्याचे सांगीतले. पोनि लोणारे यांनी त्यांची तक्रारदार व पंचांना ओळख करुन देऊन ओळख करुन घेतली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी तक्रारदार, पंच व पथकाची एकमेकांना ओळख करुन दिली. त्यावेळी पोनि लोणारे यांनी नमुद कारवाईबाबत पंचांची सहमती घेतली. त्यानंतर नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री.आकाश प्रदीप गोसावी हे व पंच क्र 2 श्री.शुभम प्रभाकर ननवरे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार अवसरमल यांना पोनि लोणारे यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली तिचा थोडक्यात सारांश खालीलप्रमाणे.
“तक्रारदार हे मागील 10 वर्षापासुन लायसन्स लाईझिनींगचे काम करीत असुन तक्रारदार यांनी एआरडी एंटरटेनमेंट प्रायव्हेट लि. (ट्रिपी टकिला) या फर्मचे अंकुर झाकर यंाचेकडुन एक्साईज डिपार्टमेंटकडे एफ एल 3 व मायक्रो ब्रोव्हरी लायसन्स काढुन देणेबाबत काम घेतले आहे. त्याबाबत एआरडी एंटरटेनमेंट प्रायव्हेट लि. (ट्रिपी टकिला) यांनी तक्रारदार यांना वर्क ऑर्डर दिलेली आहे. एफएल -3 या लायसन्स करीता संपुर्ण कागदपत्राची पुर्तता करुन सदरची फाईल तक्रारदार यांनी दिनांक 21/11/2025 रोजी एक्साईज डिपार्टमेंटचे एच झोन शास्त्रीनगर येरवडा चे इन्सपेक्टर श्री.जितेंद्र पाटील यांचकडे सादर केली आहे. सदरची फाईल ही जितेंद्र पाटील यंानी त्यांचे एक्साईज मिटींगमध्ये मंजुरीकरीता दि.13/03/2026 रोजी पुढे पाठविली आहे. दिनांक 07/04/2026 रोजी तक्रारदार यांनी त्याच फर्मची मायक्रो ब्रोव्हरीची दुसरी फाईल श्री. जितेंद्र पाटील यांचेकडे सादर केली होती. सदर फाईल बाबत माहिती घेण्यासाठी तक्रारदार हे दिनांक 09/04/2026 रोजी जितेंद्र पाटील यांना भेटण्यास गेले असता त्यंानी तक्रारदार यांचेकडे पुर्वीची एफ एल 3 ची फाईल एक्साईज मिटींगमध्ये मंजुरीकरीता पुढे पाठविली म्हणुन 12 लाख



Scanned with CamScanner

रुपयांची मागणी केली व पहील्या फाईलचे पेमेंट आल्यानंतरच मायक्रो ब्रोव्हरीची दुसरी फाईल पुढे पाठविणार व या दुस-या फाईलचे आठ लाख रुपये दयावे लागणार असल्याचे त्यांनी तक्रारदार यांना सांगीतले. श्री. जितेंद्र पाटील, एक्साईज इन्सपेक्टर एच झोन येरवडा यांनी एफएल 3 फाईल मंजुरीकरीता पुढे पाठविली म्हणुन 12 लाख रुपयांची मागणी केली व मायक्रो ब्रोव्हरीची फाईल मंजुरीकरीता पुढे पाठविण्याकरीता आठ लाख रुपये असे एकुण 20 लाख रुपयांची मागणी केली असुन ती कोणतीही शासकीय फी नसुन लाच आहे व ती देण्याची इच्छा नसल्याने श्री.जितेंद्र पाटील, एक्साईज इन्सपेक्टर यांचेविरुध्द तक्रार आहे. जितेंद्र पाटील व माझ्यामध्ये कोणतेही अर्थिक वादविवाद नाहीत. त्यामुळे त्यांचेवर आपले विभागाकडून योग्य ती कारवाई करावी'' तक्रारदार यांनी त्यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमामधुन झाले असल्याने मराठी वाचता येते पण चांगल्याप्रकारे लिहीता येत नसल्याचे सांगीतल्याने तक्रारदार यांनी सांगीतलेप्रमाणे त्यांची तक्रार पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे यांनी संगणकावर दि. 10/04/2026 रोजी टंकलिखीत केली असुन नमुद टंकलिखीत तक्रारीची प्रिंट काढलेनंतर तक्रारदार यांनी सदर तक्रार वाचुन त्यावर स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर त्यावर पंच व पोनि लोणारे यांनी समक्ष म्हणून दिनांकीत स्वाक्षरी केलेली आहे.

त्यानंतर दिनांक 10/04/2026 रोजी तक्रारदार श्री. ऋषिकांत भगवान अवसरमल यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार श्री. अवसरमल यांना एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन, येरवडा, पुणे येथील कार्यालयात पाठवून लोकसेवक जितेंद्र पाटील, इन्स्पेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन, येरवडा, पुणे हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी तक्रारदार व पंचांना शासकीय व्हाईस रेकॉर्डरबाबत माहिती देऊन पडताळणी कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये संभाषण ध्वनीमुद्रीत केले जाणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर शासकिय व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन SanDisk कंपनीचे 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. एच.सी. आय. मेमरी कार्ड त्याचे एका बाजुस Sandisk 32GB Micro SD HC I C4 ´É 4363YRDY60P1 BM MADE IN MALAYSIA असे लिहीलेले मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डर मध्ये बसविले. त्यानंतर सदरचे पडताळणी निवेदनाचे मोबाईलव्दारे व्हिडीओ रेकॉर्डींग केले जाणार असल्याची माहिती देऊन एक नवीन M ROCK कंपनीचे 16 जी.बी. चे मेमरी कार्ड त्याचे एका बाजुस. M ROCK 16 GB Micro SD HC I C10 व त्याचे दुस-या बाजुस MMC16GB8T24 –AB MDR FC2159 2508 MADE IN TAIWANअसे लिहीलेले मेमरी कार्ड मोबाईलमध्ये बसविले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून प्रथम तक्रारदार व नंतर दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाईचे निवेदन 16.12 वा.चे दरम्यान ध्वनिमुद्रीत व व्हिडीओ रेकॉर्डींग केले निवेदन संपल्यानंतर रेकॉर्डर बंद केले.

तक्रारदार व पंच क्र. 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने योग्य त्या सुचना देऊन शासकिय व्हाईस रेकॉर्डर हा पुन्हा चालु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस लावून 16.44 वा. ते 17.31 वा दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणीत लोकसेवक पाटील हे त्यांच्या केबीन मध्ये उपस्थित नव्हते त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9823940555 वरुन जितेंद्र पाटील यांचा मोबाईल क्र.9892845151 यावर कॉल केला असता, इन्स्पेक्टर पाटील यांनी तक्रारदार यांना "इन्स्पेक्शन साठी बाहर आलो आहे, इन्सपेक्शन झाले की फोन करतो" असे सांगितले. त्यांनतर तक्रारदार यांनी "चालल" असे म्हणुन फोन कट केला. लोकसेवक जितेंद्र पाटील यांची भेट न झाल्याने दि. 10/04/2026 रोजीची कारवाई तात्पुरती स्थगित करणेचे ठरविण्यात आले व पुढील कारवाई दि. 13/04/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दि. 10/04/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सिल करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 13/04/2026 रोजी पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पंच लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यानंतर दुपारी 12.02 वा चे सुमारास तक्रारदार लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पथकात नव्याने सामील करुन घेण्यात आलेले पो.अंमलदार/7364 भुषण ठाकुर व पो.अंमलदार 95 रवि दिवेकर यांची पोनि लोणारे यांनी तक्रारदार व पंचांसोबत ओळख करुन दिली. त्यानंतर पोनि लोणारे यांनी तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने झाले कारवाईबाबत सापळा पथकातील सर्वांना थोडक्यात माहिती दिली. दिनांक 10/04/2026 रोजीचे पडताळणी कारवाई वेळी ताब्यात असलेले व्हाईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्ड सिलबंद पाकीटातून काढून ते शासकिय व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले. तसेच ताब्यात असलेले व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले मेमरी कार्ड सिलबंद पाकीटातून काढून ते शासकिय व्हिडीओ कॅमेरात बसविले. त्यानंतर सदर शासकिय व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार, पंच नं. 1 व पंच क्र. 2 यांचे सापळा कारवाईचे निवेदन 12.46 वा.चे सुमारास ध्वनिमुद्रीत करून त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.

तक्रारदार व पंच क्र. 1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने योग्य त्या सुचना देऊन शासकिय व्हाईस रेकॉर्डर हा



Scanned with CamScanner

पुन्हा चालु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस लावला 13.08 वा. ते 14.54 वाजण्याचे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन, येरवडा, पुणे येथे येथे गेले तेथे त्यांची लोकसेवक पाटील साहेबांची भेट झाली. त्यावेळी पंच गोसावी हे दरवाजामध्ये थांबुन राहिल्याने लोकसेवक पाटिल यांनी तक्रारदार यांना "कोण आलेत" असे पंचांना उद्देशुन विचारणा केली. त्यावेळी तक्रारदार हे पाटील साहेब यांना "ते त्यांचा माणूस आलेलाय, अमाउंटच सगळ क्लिअर होण्यासाठी" असे म्हणाले. त्यावेळी पाटील साहेब तक्रारदार यांना "कोण आहे, बोलवा ना आत" असे म्हणाल्याने तक्रारदार हे पंच गोसावी यांना "गोसावी सर, या ना" असे म्हणाले. त्यावेळी पंच गोसावी लोकसेवक पाटील यांचे केबीनमध्ये आले. त्यानंतर बराचवेळ मायक्रो ब्रोव्हरी व एफएल 3 च्या फाईल संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "तुम्ही माझ्याकडे या... साडेचारला" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे त्यांना "हं" असे म्हणाले. त्यावर इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "साडेचारला या आपण जाऊ तिकडे, समोर दाखवुन देतो, बघुन घ्या, म्हणजे तुम्हाला मॅप करायला सोप जाईल, सगळ्या गोष्टी, तिथ तो काय जो असेल माणूस, त्याकडुन समजुन घ्या, म्हणजे काय अडचण असेल तर ते क्लिअर होईल, ठिक ए, आल्यावर बघु आपण मग ते, एकदा भेटुन घेतो मी तिथ व्हिजीटला, तुमच्या हयाला, अं....... मायक्रो ब्रोव्हरीला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे पाटील साहेब यांना "हं.." असे म्हणाले असता, इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "मायक्रो ब्रोव्हरीचा काम कुठपर्यंत झाल ते बघुन घेऊ, मग त्याच्यानुसार मग, काम, नकाशा सगळयात महत्वाचाए, तयार झाला की मग आपण स्टेटमेंटसाठी फायनल करु, ओके, तिथ आल्यावर बोलु आपण, ठिकए, चलो, ओके..." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व पंच गोसावी असे त्यांचे कार्यालयातुन बाहेर निघुन तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले.

नमुद पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री पाटील, यांनी तक्रारदार यांना सायंकाळी 04.30 वा. चे सुमारास बोलावल्याचे निष्पन्न झाल्याने पुन्हा सायंकाळी 04.30 वा. पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर 16.19 ते 18.32 वाजण्याचे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत तक्रारदार यांना लोकसेवक पाटील हे त्यांचे वाहनामधुन जाताना दिसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मो.क्रं. 9823940555 यावरुन इन्स्पेक्टर पाटील यांचा मो.क्रं. 9130555255 यावर फोन करुन त्यांच्या मोबाईलचा स्पिकर ऑन केला. त्यावेळी त्यांचेमध्ये चर्चा सुरु असताना लोकसेवक पाटील हे तक्रारदार यांना "आय बी सी ला नाय ते, वडगाव शेरीला हाय ते, तुम्ही बर या, मी ते कॉर्नरला थांबलो, लेफ्ट मारतो मी, लेफ्ट मारुन थांबतो" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार लोकसेवक पाटील यांना "हां.. बर, बर, बर, ठिकए सर" असे म्हणाले. व फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार व पंच गोसावी असे इन्स्पेक्टर पाटील यांचे वाहना मागोमाग त्यांनी सांगीतलेप्रमाणे निघुन आयबीसी बीअर फॅक्टरी, वडगाव शेरी येथे पोहोचले. सदर ठिकाणी पोहोचुन तक्रारदार, पंच गोसावी व इन्स्पेक्टर पाटील असे नमुद फॅक्टरी मध्ये गेले. त्यावेळी इन्स्पेक्टर पाटील यांनी फॅक्टरीची पाहणी करून इन्स्पेक्टर पाटील यांनी फॅक्टरीमध्ये उपस्थित असलेल्या इसमाकंडून त्यांनी आवश्यक ती सर्व माहिति घेतली. त्यावेळी त्यांच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर इन्स्पेक्टर पाटील सदर ठिकाणाहून निघुन रेस्टारंट ट्रिपी टकीला, कल्यानीनगरच्या दिशेने रवाना झाले त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना सदर ठिकाणी येण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार हे पचं गोसावी यांना सोबत घेऊ न त्यांचे मागोमाग गेले. काहीवेळात तक्रारदार व पंच रेस्टारंट ट्रिपी टकिला, कल्याणीनगर येथे पोहचले त्यावेळी इन्स्पेक्टर पाटील हे सदर ठिकाणी तक्रारदार यांची वाट पाहत थांबुन राहिले होते. तक्रारदार व पंच सदर ठिकाणी पोहचल्यावर इन्स्पेक्टर पाटील हे तक्रारदार यांना "उशीर लागला तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे त्यांना "ट्रॅफिक" असे म्हणाले.त्यांनतर तक्रारदार पंच गोसावी व इन्स्पेक्टर पाटील हे रेस्टारंट ट्रिपी टकिला, कल्याणीनगर मध्ये गेले. सदर ठिकाणी मायक्रो ब्रोव्हरी प्लांटची पाहणी पाटील यांनी केली. पहाणी करीत असताना इन्स्पेक्टर पाटील हे तक्रारदार यांना त्यांच्या कामासंदर्भात माहिती विचारत होते त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांना माहिती दिली. त्यावेळी तक्रारदार व इन्स्पेक्टर पाटील यांचेमध्ये एफएल थ्री व मायक्रो ब्रोव्हरी च्या परवान्याबाबत चर्चा सुरू होती त्या दरम्यान तक्रारदार इन्स्पेक्टर पाटील यांना "मंग आता एफएल 3 च काय?, त्यांनला बोलवल होत" अशी विचारणा पंचांकडे इशारा करत केली. तेंव्हा इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "हा म ठिकए ना एफ एल 3 च मी सांगतो ना त्यांना, ते पण बघुन सांगाव लागल मला, ते अकरा पर्यत जाईल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे त्यांना "हे का?" असे बोललो. त्यावर इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "हं" असे म्हणाले. तेंव्हा तक्रारदार यांनी इन्स्पेक्टर पाटील यांना "आणि एफएल 3 च?" अशी विचारणा केली असता इन्स्पेक्टर पाटील "दहा-अकरा पर्यंत, एफएल 3 च म्हणतोय मी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे इन्स्पेक्टर पाटील यांना "एफएल 3 च म्हणताय" असे म्हणाले असता ते तक्रारदार यांना "हा" म्हणाले. तेंव्हा तक्रारदार यांनी इन्स्पेक्टर पाटील यांना "आणि हयाच" अशी विचारणा केली असता, इन्स्पेक्टर पाटील तक्रारदार यांना "ते मोस्टली 9-10 पर्यत जाईल अंदाजे माझ्या" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हे इन्स्पेक्टर पाटील यांना "म टोटल 19 लाख रुपये" असे म्हणाले. त्यावर



Scanned with CamScanner

इन्स्पेक्टर पाटील हे तक्रारदार यांना "हा ते सांगतो ना, मी आता पुन्हा मी तुम्हाला काहिहि सांगायच, तुम्ही मंग तोच शब्द धरणार, साहेब तुम्ही असेच म्हणले होते, असेच म्हणले होते, आली पंचायत" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे इन्स्पेक्टर पाटील यांना "ठिकए" असे म्हणाले.

एकंदरीत तक्रारदार श्री अवसरमल यांचे तक्रारीच्या अनुशंगाने पंच ासमक्ष लोकसेवक श्री पाटील, एक्साईज इन्स्पेक्टर, एच झोन, येरवडा, पुणे यांचेकडे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री पाटील, यांनी तक्रारदार यांना एफ एल 3 ची फाईल पुढे पाठविली म्हणुन 11 लाख रुपये व मायक्रो ब्रोव्हरीची फाईल पुढे पाठविण्याकरीता 08 लाख रुपयांची अशी एकुण 19 लाख रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. परंतु इन्स्पेक्टर पाटील यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम आहे अगर शासकीय फि याबाबत पुन्हा पडताळणी कारवाई करुन तक्रारदार अवसरमल यांनी शासकीय फि ची रक्कम भरल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. दि. 13/04/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सील करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 13/04/2026 रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक पाटील यांनी मागणी केलेली 19 लाख रुपये रक्कम ही लाच रक्कम आहे अगर शासकीय फि याबाबत स्पष्टता करणेकरीता पोनि लोणारे यांनी दि. 29/04/2026 रोजी पडताळणी कारवाई करीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक पाटील यांचे एक्साईज कार्यालय, एच झोन, येरवडा येथे दुपारी 13.33 वा. ते 14.19 वा. दरम्यान पाठविण्यात आले. परंतु नमुद पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक पाटील हे 01 मे परेडनिमीत्त शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे गेले असुन ते दि. 04/05/2026 रोजी कार्यालयात येणार असल्याचे निष्पन्न झालेने पुढील कारवाई दि. 04/05/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दि. 29/04/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सील करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 29/04/2026 रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक पाटील हे 01 मे परेडनिमीत्त शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे गेले असुन ते दि. 04/05/2026 रोजी कार्यालयात येणार असल्याचे निष्पन्न झालेने पुढील कारवाई दि. 04/05/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुशंगाने दि. 04/05/2026 रोजी पडताळणी कारवाई करीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक पाटील यांचे एक्साईज कार्यालय, एच झोन, येरवडा येथे दुपारी 14.00 वा ते 15.05 वा. दरम्यान पाठवीले आले. नमुद पडताळणी कारवाई दरम्यान कार्यालयात लोकसेवक पाटील यांची भेट होवुन लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांची फाईल कलेक्टर ऑफिसमध्ये पेंडींग असल्याचे सांगुन "मला जेंव्हा पत्र येईल किंवा कळाल बी, की लगेच व्हॉटसअ ॅप ला पाठवतो, बस" असे म्हणाल्याने लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेसोबत संपर्क केल्यानंतरच पुढील कारवाई करण्याबाबत ठरविण्यात आले. दि. 04/05/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सील करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 12/05/2026 रोजी आम्ही तक्रारदार यांना संपर्क साधुन त्यांना पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे यांची पदोन्नतीने बदली झाल्याने पुढील कारवाई सापळा कारवाई आम्ही करणार असल्याचे सांगुन तक्रारदार व पंच यांना दि. 13/05/2026 रोजी लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिल्या. आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे तक्रारदार व पंच लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी मी, तक्रारदार व पंच यांना माझी ओळख करुन देऊन त्यांची ओळख करुन घेतली व पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे यांचे बदलीबाबत थोडक्यात माहिती देऊन तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आत्ता पर्यन्त करण्यात आलेल्या कारवाईबाबत सर्वांना थोडक्यात माहिती दिली. त्यावेळी तक्रारदार यांनी आम्हाला पंचांसमक्ष "त्यांची फाईल कलेक्टर ऑफिसमधुन मंजुर होऊन आलेली असुन त्याबाबत तक्रारदार यांनी माहिती घेतलेली आहे. त्यावरुन तक्रारदार हे आज रोजी पाटील साहेब यांना भेटुन त्यांच्या फाईलबाबत तसेच चलनासंदर्भात चर्चा करणार आहे त्यावेळी ते लाच रकमेबाबत चर्चा करतील आणि त्यानंतरच चलन देतील, त्यामुळे आज रोजी कारवाई करणे योग्य राहील." असे म्हणाले त्यामुळे आम्ही तात्काळ पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्याअनुशंगाने दि. 13/05/2026 रोजी पडताळणी कारवाई करीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक पाटील यांचे एक्साईज कार्यालय, एच झोन, येरवडा येथे दुपारी 12.43 वा ते 14.19 वा. दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणीत तक्रारदार यांची लोकसेवक पाटील यांचेसोबत फोनवर तसेच समक्ष भेट झाली असता, लोकसेवक श्री पाटील, यांनी तक्रारदार यांना त्यांचे कामाचे अनुशंगाने कागदपत्रांची पुर्तता करुन अपडेट देण्याबाबत सांगीतले असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आम्ही



Scanned with CamScanner

तक्रारदार यांना लवकरात लवकर कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत सुचना दिली व दि. 13/05/2026 रोजी कारवाई स्थगीत करण्यात आली. दि. 13/05/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले मेमरी कार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सील करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 20/05/2026 रोजी तक्रारदार अवसरमल यांनी आम्हास संपर्क साधुन कागदपत्रांची पुर्तता झाली असुन पुढील कारवाई दि. 21/05/2026 रोजी करण्याची विनंती केली. त्याअनुषंगाने आम्ही पंच व पथकास दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 21/05/2026 रोजी सकाळी 10.00 वा लाप्रवि,पुणे कार्यालयात हजर झालो. तक्रारदार श्री अवसरमल दुपारी 12.40 वा चे सुमारास लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी तक्रारदार अवसरमल यांनी आम्हास पंचासमक्ष सांगीतले की, "त्यांच्या फाईलच्या अनुशंगाने त्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असुन त्याबाबत तक्रारदार यांनी काल दिनांक 20/05/2026 रोजी इन्स्पेक्टर पाटील साहेब यांना फोन केला असता, पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना दिनांक 21/05/2026 रोजी भेटण्यास बोलाविले असुन, ऑफिसला येऊ नको, बाहेर भेटु, तसेच येताना एकटाच ये, कोणाला सोबत आणु नको, सोबत कोणी असले की, बोलता येत नाही, असे बोलले असल्याचे सांगुन सदरचा फोन कॉल रेकॉर्ड केला असल्याचे सांगीतले." सदरचा रेकॉर्ड केलेला कॉल आम्ही तक्रारदार यांचे मोबाईलमध्ये पंचासमक्ष ऐकला आहे. त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने झाले कारवाईबाबत आम्ही सर्वांना थोडक्यात माहिति देऊन पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. त्याअनुषंगाने दि. 13/05/2026 रोजी वापरण्यात आलेले मेमरीकार्ड सलग वापरण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने दि. 21/05/2026 रोजी पडताळणी कारवाई करीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक पाटील यांचे एक्साईज कार्यालय, एच झोन,येरवडा येथे दुपारी 14.23 वा ते 15.28 वा. दरम्यान पाठवीले आले. नमुद पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक पाटील यांचेसोबत फोनवर तसेच समक्ष भेट झाली असता, लोकसेवक श्री पाटील, यांनी तक्रारदार यांना त्यांचे कामाचे अनुशंगाने चर्चा होत असताना, पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना "काय तुमचं कुठ पर्यंत आलं" अशी कामासंदर्भात विचारणा केली त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "झालं ना सर" असे म्हणाले. त्यानंतर त्यांचेमध्ये एफएल श्री व मायक्रो ब्रोव्हरीचे परवान्यासंदर्भात चर्चा सुरु असताना पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोबाईलमध्ये "12" आकडा टाईप करुन तक्रारदार यांना दाखविला व "लायसन्स देण्याच्या पुर्वी हा फिगर लक्षात राहु दया" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "हा" असे म्हणाले. त्यावेळी पाटील साहेब तक्रारदार यांना "ठिकेय ...त्याच्या मुळें त्याचं वेगळं सांगितलं..." असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार पाटील साहेब यांना "त्याचं सांगा ना मगं.." असे म्हणाले असता, पाटील साहेब यांनी तक्रारदार यांना त्यांचे मोब ईलमध्ये "10" आकडा टाईप करुन दाखविला व "त्याचं माझ्या माहिती नूसार एवढं..." असे म्हणाले. त्यावर तक्रारदार पाटील साहेब यांना "हं.. टोटल बावीस लाख..." असे म्हणाले असता पाटील साहेब तक्रारदार यांना "ओके, तुम्हाला सांगीतल, ऐनवेळेस परेशानी नको" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा सुरु असताना तक्रारदार पाटील साहेब यांना "हम..कधी येवु मग.." अशी विचारणा केली असता पाटील साहेब तक्रारदार यांना "या दोन तासात पाच पर्यंत" असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी पाटील साहेब यांना "पाच वाजे पर्यत" अशी विचारणा केली असता, पाटील साहेब तक्रारदार यांना "आलं की व्हाट्स अप कॉल करा .. तेवढी तयारी करा ..." असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "येवु" अशी विचारणा करुन लोकसेवक पाटील यांचे केबीनमधुन बाहेर निघुन पंच यांना सोबत घेऊन दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. सदर पडताळणीच्या वेळेसे लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना 17.00 वा चे सुमारास व्हॉटसअॅप कॉल करण्यास सांगीतल्याने त्याप्रमाणे कॉल केल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. दरम्यान चे कालावधीत लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार श्री अवसरमल यांचे मोबाईलवर व्हॉटसअॅपव्दारे एफएल-श्री परवाना मंजुर झालेबाबतचे माहितीचे पत्र पाठविले. नमुद पत्रामध्ये भरणा करण्यात येणा-या शासकीय फि देखील नमुद केली असल्याचे दिसुन आले आहे. नमुद पत्राच्या अनुशंगाने आमचे सुचनेवरुन तक्रारदार अवसरमल यांनी लोकसेवक पाटील यांचे मोबाईलवर कॉल करुन सदर पत्राच्या अनुशंगाने चर्चा केली त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना चलन घेण्यासाठी कधी येऊ अशी विचारणा केली असता, पाटील साहेबांनी तक्रारदार यांना चलन घेण्यासाठी लगेच बोलाविल्याचे निष्पन्न झाले. त्यांचेमध्ये झालेला कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. एंकदरीत लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयात चलन घेण्याकरीता बोलाविले असल्याचे निष्पन्न झाल्याने तक्रारदार यांना पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंचांसह लोकसेवक पाटील यांची भेट घेणेकरीता व शासकीय फि चे चलन घेणेकरीता सायंकाळी 17.44 वा चे दरम्यान पाठविण्यात आले. 18.52 वा सुमारास तक्रारदार व पंच असे लाप्रवि, पुणे कार्यालयात आले. नमूद पडताळणी दरम्यान तक्रारदार व पंच लोकसेवक यांचे कार्यालात गेल्यानंतर कार्यालयातील



Scanned with CamScanner

लोकसेवक महेश यांचेकडुन तक्रारदार यांनी शासकीय फि च्या चलनाची प्रत घेतली. सदरची प्रत घेऊन तक्रारदार व पंच गोसावी लोकसेवक पाटील यांना भेटण्यास त्यांचे केबीनमध्ये गेले. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना चलनाची प्रत दाखवत "सर आता हे चलन भरतो" असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक पाटील तक्रारदार यांना "भरा ना" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "आणि तुम्ही सांगितलेले बारा ..कधी पर्यंत आणु तुम्ही सांगा" असे म्हणाले असता लोकसेवक पाटील तक्रारदार यांना "झालं की सांगा" असे म्हणाले त्यावर तक्रारदार लोकसेवक पाटील यांना "झाल की सांगतो...बारा लाख तयार करुन फोन करतो तुम्हाला" असे म्हणाले असता लोकसेवक पाटील तक्रारदार यांना "तुम्ही फक्त निरोप...फोन करा, व्हाटॅस अप कॉल" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "हो" असे म्हणाले. एकंदरीत तक्रारदार श्री. अवसरमल यांचे तक्रारीच्या अनुशंगाने लोकसेवक श्री पाटील, एक्साईज इन्स्पेक्टर यांचेकडे करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांना मिळालेल्या शासकीय चलनाव्यतीरीक्त एफएल श्री परवान्याकरीता 12 लाख रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न होऊन लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना पैसे तयार झाले की फोन करा असे सांगीतल्याचे निष्पन्न झाले म्हणून दि. 22/05/2026 रोजी लोकसेवक पाटील यांना कॉल करुन पुढील सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना लाच रकमेची तजवीज करणेबाबत व दि. 22/05/2026 रोजी सकाळी 10.00 वा लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर दि. 21/05/2026 रोजीची कारवाई स्थगीत करण्यात आली. दि. 21/05/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले दोन्ही मेमरी कार्ड सिल करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 22/05/2026 रोजीच्या पडताळणी कारवाईकरीता व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड वापरण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुशंगाने आम्ही एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड पंचांना दाखवीले. सदरचे मेमरीकार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता त्यावर sandisk 8 GB Micro SD HC I C4a 42170 TJS60LN B1 MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. त्यानंतर कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार व दोन्ही पंचंाचे निवेदन घेण्यात आले. त्यानंतर फोनवर करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयात बोलाविल्याचे निष्पन्न झालेने वरिष्ठ अधिका-याबाबत विचारणा करणेकरीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक पाटील यांचे एक्साईज कार्यालय, एच झोन, येरवडा येथे दुपारी 13.19 वा ते 14.30 वा. दरम्यान पाठवीले आले. नमुद पडताळणी कारवाई दरम्यान कार्यालयात लोकसेवक पाटील यांची भेट होवुन तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना "काहितरी कमी केल तर बर होईल" असे बोलले असता, लोकसेवक पाटील तक्रारदार यांना "अकरा कर, कोणाला सांगु नको" असे म्हणाले. त्यानंतर बराच वेळ लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेसोबत त्यांच्या कामाच्या अनुशंगाने चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना चलन, बँक गॅरंटी व एनएससी प्रमाणपत्राबाबत विचारणा केली त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना शासकीय चलन भरले असुन बँक गॅरंटी व एनएससी प्रमाणपत्र बाकी असल्याचे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना "धनाजीला जाऊन भेट व बँक गॅरंटी व एनएससी प्रमाणपत्र भरल्याशिवाय इकड फिरकु नको आणि धनाजी ला भेटल्यानंतर मला फोन कर" असे संागीतले असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लोकसेवक पाटील यांनी सांगीतल्याप्रमाणे तक्रारदार यांना दुपारी 15.00 वा. ते 15.25 वा. दरम्यान व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच क्रं 01 गोसावी यांचेसह लोकसेवक धनाजी, एक्साईज कार्यालय, अलंकार चौक येथे पाठविले असता, सदर ठिकाणी लोकसेवक धनाजी यांची भेट होऊन लोकसेवक धनाजी यांनी तक्रारदार यांना बँक गॅरंटी व एनएससी सर्टीफिकेट आणुन देणेबाबत सांगीतले असल्याचे निष्पन्न झाले. सदरबाबत आमचे सुचनेवरुन तक्रारदार अवसरमल यांनी लोकसेवक पाटील यांना व्हॉटसअॅप फोन करुन सांगीतली व त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "मग आता काय साहेबांना वैगेरे भेटायची काय गरजं नाहीये ना सर..." असे बोलले असता लोकसेवक पाटील हे तक्रारदार यांना "भेटुन काय करणार जर तुम्ही कागदच दिला नाय तर भेटायची काय गरज ये जो पर्यत तुमचं डॉक्युमेंट होत नाही तो पर्यत आपण कोणाला बोलु पण शकत नाही ना .." असे म्हणाले. सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. एकंदरीत लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार अवसरमल यांना बँक गॅरंटी व एनएससी प्रमाणपत्राचे काम पुर्ण झाल्यानंतर संपर्क करण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना सापळा कारवाईच्या अनुशंगाने बँक गॅरंटी व एनएससी प्रमाणपत्राचे काम पुर्ण करुन लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर दि. 22/05/2026 रोजीची कारवाई स्थगित करण्यात आली. दि. 22/05/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान वापरलेले दोन्ही मेमरी कार्ड सिल करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.



Scanned with CamScanner

दि. 25/05/2026 रोजी दोन्ही पंचांसमक्ष तक्रारदार अवसरमल यांनी आम्हास कार्यालयात समक्ष हजर राहुन सांगीतले की, बँक गॅरंटीचे काम पुर्ण झालेले असुन एनएससी प्रमाणपत्राचे काम पुर्ण झालेनंतर दि. 26/05/2026 रोजी पुढील कारवाई करु असे सांगितल्याने दि. 26/05/2026 रोजी पुढील कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. दि. 26/05/2026 रोजी दुपारी 15.30 वा तक्रारदार अवसरमल हे लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर झाले. त्यावेळी त्यांनी बँक गॅरंटी व एन.एस.सी. प्रमाणपत्राचे काम पुर्ण झाले असल्याचे आम्हास पंचासमक्ष सांगीतले. लोकसेवक श्री. पाटील यांनी तक्रारदाराकडे केलेल्या लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तक्रारदार यांना लोकसेवकश्री. पाटील, एक्साईज इन्स्पेक्टर यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम रू. 21 लाख रुपयांपैकी 11 लाख रुपये हजर ुरण्यास सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांना दयावयाच्या रू. 11,00,000/- लाचेच्या रकमेची व्यवस्था होवू शकली नाही, त्यांच्याकडे सध्या त्यांचे बचतीतील रू. 1 लाख रुपये असून उर्वरीत रक्कम जुळविणे त्यांना शक्य नाही असे सांगून भारतीय चलनातील रू.500/- दराच्या 100 रुपयांचे 2 बंडल असे एकुण रू. 1,00,000/- हजर केल्या. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पंच क्र. 2 यंाचे मार्फतीने दोन पानावर लिहीण्यात आले त्यावर आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी स्वाक्षरी केली आहे. लोकसेवकयांनी लाचेची मागणी केलेल्या अकरा लाख रुपये इतक्या लाच रकमेपैकी उर्वरीत रकमेची पुर्तता करणेकरीता पाचशे दराच्या नोटेसारख्या दिसणारे खेळण्यातील नोटांचा लाच रकमेत समावेश करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानुसार प्रत्येकी 100 नोटांचे 20 बंडल तयार करून घेतले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच, आणि तक्रारदार श्री. अवसरमल यांना अल्ट्रा व्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर म.पो.हवा. 8060 पोर्णीमा साका यांनी प्रत्येकी 10 बंडलचे दोन बंडल असे रबर लावून एकत्रित बांधून ते एका वर्तमानपत्रामध्ये गुंडाळुन रबराने पॅक करुन त्यावर देखील अॅथ्रासिन पावडर लावली. नंतर वर्तमानपत्रामध्ये गुंडाळलेला सदरच्या नोटांचा गठ्ठा एका पिवळया रंगाच्या पिशवीमध्ये ठेवुन सदरची पिशवी तक्रारदार यांनी हजर केलेल्या एका काळया रंगाच्या बॅग मध्ये ठेवले नंतर तक्रारदार यांनी बॅगची चैन लावुन ती बॅग त्यांच्या ताब्यात घेतली. म.पो.हवा. पोर्णीमा साका यांना सापळा पथकातून वगळण्यात आले. त्यानंतर तक्रारदार अवसरमल सापळा पथक व पंच यांचे दोन्ही हात व कपडे अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता तक्रारदार यांचे जवळील कापडी पिशवी व काळया रंगाचे बॅग चे मध्यल्या कप्प्यातील आतील बाजुस सोडुन या व्यतिरिक्त कोणाच्याही हातावर किंवा कपडयांवर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंचांना व पथकास सापळा कारवाईच्या अनुशंगाने सुचना दिल्या. दि. 22/05/2026 रोजी कारवाई वेळी जप्त करून जतन केलेले मेमरी कार्ड सिलबंद लिफाफ्यातून काढून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकले. व्हिडीओ चित्रीकरणाच्या फाईल्स जतन करण्याकरीता वापरलेले मेमरी कार्ड शासकिय व्हिडीओ कॅमेरामध्ये टाकले. तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुशंगाने निवेदन 16.42 वा.व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण केले आहे. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांचा व्हॉटसअॅप मिस कॉल आला असल्याचे सांगीतल्याने आम्ही दिलेल्या सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक पाटील यांचे मोबाईलवर फोन केला त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार अवसरमल यांचा फोन रिसीव्ह केला. त्यांचेमध्ये चर्चा सुरु असताना लोकसेवक पाटील हे तक्रारदार यांना "हे तुम्ही चक्कर मारा तुम्ही ईथ या, तुमच्यासमोर ती मॅडमला फोन लावतो मी" असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक पाटील यांना "हे घेऊन येतोय आँ.. हॅलो" असे बोलुन फोन कट केला. सदरचे फोनवरील संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनांची उजळणी करुन देऊन पोशि ठाकुर यांचे सहाय्याने तक्रारदार यांचे शर्टच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालू करून लावून तक्रारदार व पंच यांना 17.18 वा. तक्रारदार व पंच त्यांचेकडील गाडीने रवाना झाले व त्यांचेपाठोपाठ आम्ही शासकीय वाहनाने रवाना झालो तक्रारदार व पंच हे येरवडा एक्साईज कार्ययलासमोर पोहोचुन त्यांचे दुचाकी वाहन पार्क करुन कार्यालयात गेले. त्यावेळी संपुर्ण पथक व पंच क्रं 02 शासकीय वाहनाने सदर ठिकाणी पोहोचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सुरक्षीत ठिकाणी आम्ही सापळा लावून आजूबाजूला थांबून राहीलो. त्यावेळी तक्रारदार व पंच क्रं 01 असे लोकसेवक पाटील यांची भेट घेतली. तेंव्हा लोकसेवक पाटील यांनी पंच क्रं 01 यांना कार्यालयाच्या बाहेर थांबुन राहणेबाबत सांगीतल्याने पंच क्रं 01 कार्यालयाच्या बाहेर असलेल्या मोकळया जागेत थांबुन राहिले. त्यावेळी तक्रारदार व लोकसेवक पाटील यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी पंच क्रं 01 लोकसेवक यांचे कार्यालयाच्या दरवाजाजवळ उभे असल्याने त्यांना तक्रारदार व लोकसेवक यांचेमध्ये होणारे संभाषण स्पष्ट ऐकु येत होते. त्यावेळी संभाषणा दरम्यान लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना लाच रकमेच्या बॅगेकडे इशारा करत "किती आहेत ती.." अशी विचारणा केली. त्यावर तक्रारदार हे लोकसेवक यांना "11 आहेत" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेमध्ये काहिवेळ चर्चा झाली त्यावेळी लोकसेवक



Scanned with CamScanner

तक्रारदार यांना "माझ्या मागे मागे ये गाडीत बस.." असे म्हणाल्याने तक्रारदार व लोकसेवक त्यांचे केबीनमधुन निघुन लोकसेवक यांचे ताब्यात असलेल्या पांढ-या रंगाच्या स्विफ्ट डिझायर या वाहनाजवळ पार्किंग मध्ये आले. लोकसेवक यांनी सदरचे वाहन सुरु केले त्यावेळी तक्रारदार हे नमुद वाहनामध्ये बसले. त्यानंतर लोकसेवक यांनी सदरचे वाहन कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ चालवत घेवून जावून थोडया अंतरावर थांबविले व लोकसेवक पाटील हे तक्रारदार यांना "दोन मिनिट थांबता का..?" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार हे वाहनातुन खाली उतरत लोकसेवक पाटील यांना "कुठ ऑफिस पाशीच थांबु का." अशी विचारणा केली असता लोकसेवक काहिएक चर्चा न करता सदर ठिकाणाहुन निघुन गेले. त्यानंतर काहिवेळाने तक्रारदार यांचे मोबाईलवर लोकसेवक पाटील यांनी फोन कॉल करुन तक्रारदार यांना "मी माझं काम करून एसपी ऑफिसकडे येतो. पहिले तुम्ही बघितल चलन अपलोड करायसाठी जावा पटकन." असे सांगीतल्याने तक्रारदार हे पंच क्रं 01 यांना सोबत घेऊन त्यांचेकडील दुचाकी वाहनाने अधीक्षक कार्यालय,एक्साईज विभागाकडे रवाना झाले. त्यांचे मागोमाग आम्ही संपुर्ण पथक व पंच क्रं 2 शासकीय वाहनाने थोडे अंतर ठेवून रवाना झालो. एसपी कार्यालयाच्या बाहेरील दुकानासमोर तक्रारदार त्यांचे दुचाकी वाहना पार्क करुन तक्रारदार व पंच क्रं 01 कार्यालयात गेल परंतु कार्यालयात कोणीहि उपस्थीत नसल्याने ते दोघेही कार्यालयातुन निघुन खाली आले व नंतर त्यांचे दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. त्यांचे मागोमाग संपुर्ण पथक शासकीय वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. त्यानंतर मी पंच क्रं 01 व तक्रारदार यांचेकडुन सापळा कारवाई दरम्यान झालेल्या घटनेबाबत माहिती घेत असताना तक्रारदार यांनी लोकसेवक पाटील यांना फोन कॉल येत असलेबाबत सांगीतले. त्यावेळी सदरचा कॉल रिसीव्ह करुन स्पिकर ऑन करणेबाबत मी तक्रारदार यांना सुचना दिली. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांचेसोबत चलनासंदर्भात चर्चा केली. सदरचा कॉल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. दरम्यान लोकसेवक पाटील यांनी तक्रारदार यांना तुम्ही जा मी चलन upload करुन घेतो,उदया callकरतो असे व्हॉटस अॅप ला मेसेज करुन सांगितल्याने दि.26/06/2026 रोजीची सापळा कारवाई स्थिगित करण्यात आली व पुढील कारवाई ही 27.05.2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे हजर राहण्याच्या सर्वांना सुचना दिल्या व कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 27/05/2026 तक्रारदार अवसरमल, पंच व सापळा पथक हे लाप्रवि कार्यालयात 11.15 वाजता उपस्थित झाल्याने पुढील सापळा कारवाई करण्यात आली त्यावेळेस लोकसेवक पाटील यांचे कार्यालयास कुलुप असल्याने त्यांचे कार्यालयात मिळून आले नाही तसेच त्यांचे फोन देखील बंद असल्याने दि. 27/05/2026 रोजीची कारवाई स्थगीत करण्याबाबत ठरविण्यात आले. कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि. 31/07/2026 रोजी तक्रारदार श्री. ऋषिकांत भगवान अवसरमल वय-37 वर्षे, व्यवसाय लायसन्स कन्सल्टंट रा. बी /2023 प्लॉट नं. 3 विमानदर्शन, संजय पार्क पुणे - 32 पुणे यांनी लाप्रवि, पुणे कार्यालयात समक्ष हजर राहुन लोकसेवक पाटील यांना माझ्यावर संशय आलेने ते माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याबाबत खात्री झाली असल्याचे सांगुन त्यांचे एफएल थ्री परवाना त्यांना मिळाला असल्याबाबत सांगितले.

तरी प्रस्तुत तक्रारदार श्री. ऋषिकांत भगवान अवसरमल यांनी दिनांक 10/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिलेल्या लाच मागणीचे तक्रारीचे अनुशंगाने पंचांसमक्ष दि.13/04/2026 रोजी 16.19 ते 18.32 वाजण्याचे दरम्यान ट्रिपी टकिला, कल्यानीनगर पुणे येथील मायक्रो ब्रोव्हरी प्लांट येथे पडताळणी कारवाई च्या वेळेस लोकसेवक श्री.जितेंद्र पाटील, इन्सपेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा यांनी तक्रारदार यांचेकडे एआरडी एंटरटेनमेंट प्रायव्हेट लि. (ट्रिपी टकिला) या फर्मची एफ एल 3 चा परवाना मिळण्याची फाईल मंजुरीसाठी पुढे पाठविली म्हणुन 11 लाख रुपये व मायक्रो ब्रोव्हरीची फाईल पुढे पाठविण्याकरीता 08 लाख रुपयांची अशी एकुण 19 लाख रुपये मागणी केली. तसेच सदर मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत स्पष्टता येणेकरीता पुन्हा दिनांक 21/05/2026 रोजी 14.23 ते 15.28 वा. व 17.44 ते 18.52 वा दरम्यान एक्साईज कार्यालय, एच झोन, येरवडा शास्त्रीनगर, पुणे येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कारवाईमध्ये श्री.जितेंद्र पाटील, इन्सपेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा यांनी तक्रारदार यांचेकडे एफएल थ्री फाईल पुढे पाठविली याचा मोबदला म्हणुन 12 लाख रुपयांची व मायक्रो ब्रोव्हरी परवान्याकरीता 10 लाख रुपये अशी एकुण 22 लाख रुपयांची लाचेची मागणी करून एफ एल 3 चा परवाना मिळण्याची फाईल मंजुरीसाठी पुढे पाठविली म्हणुण 12 लाख रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. दि. 22/05/2026 रोजी दुपारी 13.19 वा ते 14.30 वा दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री.जितेंद्र पाटील, इन्सपेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा यांनी तक्रारदार



Scanned with CamScanner

यांचेकडे एआरडी एंटरटेनमेंट प्रायव्हेट लि. (ट्रिपी टकिला) या फर्मचा परवाना मिळविण्याची फाईल मंजुरीसाठी पुढे पाठविली म्हणुन 12 लाख रूपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती 11 लाख रुपयांची लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली व दिनांक 26/05/2026 रोजी 17.18 ते 19.27 वाजण्याचे दरम्यान एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा या ठिकाणी लोकसेवक श्री.जितेंद्र पाटील, इन्सपेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या 11 लाख रूपये लाच रक्कमेबाबत विचारणाकरून ती स्विकारण्याची तयारी दर्शवून त्यांनतर तक्रारदार यांना त्यांचे कार्यालयातून खाली पार्किंग मध्ये त्यांचे वाहन पांढ-या रंगाच्या स्विफ्ट डिझायर या कारमध्ये बसवून त्या वाहनातून थोडे अंतर सोबत बरोबर घेवून लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला, मात्र तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम न स्विकारता त्यांना त्यांचे गाडीतून खाली उतरून थांबण्यास सांगितले व त्यांचे ताब्यातील वाहन घेवून कार्यालयाचे आवारातून बाहेर निघून गेले. अशा प्रकारे लोकसेवक श्री. जितेंद्र हरिश्चंद्र पाटील, वय 47 वर्षे ,इन्सपेक्टर, एक्साईज डिपार्टमेंट, एच झोन शास्त्रीनगर येरवडा, पुणे मो नं 9892845151, 9130555255यांनी तक्रारदार यांचे एआरडी एंटरटेनमेंट प्रायव्हेट लि. (ट्रिपी टकिला) या फर्मची एफएल थ्री फाईल मंजुरी करीता पुढे पाठविली याचा मोबदला म्हणुन 12 लाख रुपयांची व मायक्रो ब्रोव्हरी परवान्याकरीता 10 लाख रुपये अशी एकुण 22 लाख रुपयांची लाचेची मागणी करून, एफ एल 3 चा परवाना मिळण्याची फाईल मंजुरीसाठी पुढे पाठविली म्हणुण तडजोडीअंती 11 लाख रूपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवून लाच मिळविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना कारवाईचा संशय आल्याने त्यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही म्हणून माझी सरकारतर्फ त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.दाखल अधिकारी--सतिश संभाजी वाळके, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उप-अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे--तपासी अधिकारी--निता मिसाळ, पोलीस उप-अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

UMESH AMBADAS GITTE(I (Inspector)) / DCPSNO15101000402UAGM84010 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complaina:.t / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

HC3959
ठाणे अंमलदार
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर.

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): UMESH AMBADAS G
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DCPSNO15101000402L

10/08

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner